# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 11.08.2024** **वार– रविवार**

---

देशी गाय

पुण्यातील कृषी महाविद्यालयातील देशी गाय संशोधन आणि प्रशिक्षण केंद्राला राज्य सरकारनं 'सेंटर ऑफ एक्सलन्स' चा दर्जा बहाल केला आहे. यामुळे हे देशी गाईसाठीचं देशातील पहिलं अशा पद्धतीचं संशोधन केंद्र ठरणार आहे. यामुळं आता या केंद्रात चाऱ्यासाठी सायलो बंकर, उंदीर प्रतिबंधक गोदाम, गोबर गॅस प्रकल्प, पाणीपुरवठा यंत्रणा, मिल्कींग पार्लर, प्रयोगशाळा इमारत, सौर ऊर्जा प्रकल्प आदी अत्याधुनिक सुविधांची निर्मिती केली जाणार आहे. यासाठी राज्य सरकारनं ७१ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली असल्याचं केंद्रप्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने यांनी सांगितलं.

कान बाई

खानदेशात नागपंचमीनंतरच्या पहिल्या रविवारी साजरा होणारा पारंपरिक कानबाई - रानबाई उत्सव आज चाकण इथं वास्तव्याला असलेल्या खानदेशी बांधवांनीही मोठ्या उत्साहात साजरा केला. या कार्यक्रमाला जळगावच्या खासदार स्मिता वाघ उपस्थित होत्या.

जरांगे

आरक्षण मिळेपर्यंत हटणार नाही आणि हटायचे नाही, असा निर्धार मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आज पुण्यात झालेल्या सभेत व्यक्त केला. या सभेसाठी अनेक मराठा समाज बांधव उपस्थित होते.

डेंगू

पिंपरी शहरात जूनपासून डेंग्यूच्या रुग्णांची संख्या वाढत असून आतापर्यंत 57 जणांना लागण झाली आहे. शहरात चिकनगुनियाचेही सात रुग्ण आहेत. झिकाचे दोन्ही रुग्ण बरे झाले असून त्यांना घरी सोडण्यात आलं आहे, अशी माहिती महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी दिली.

Pcmc

कीटक जन्य आजारांना आळा घालण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं शहरातील कार्यालयं, गृहनिर्माण संस्थांमध्ये तपासणी मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत बांधकामाच्या ठिकाणी डासोत्पत्ती केंद्र आढळल्यानं 40 हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. सर्व नागरिकांनी आपल्या घरात आणि घराजवळच्या परिसरात डासोत्पत्तीची केंद्रं निर्माण होणार नाहीत, याची काळजी घ्यावी असं आवाहन महापालिकेनं केलं आहे.

पीएमपीएमएल

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. अर्थात पीएम पी एमएलतर्फे औंध गावातील पास केंद्र पुन्हा सुरू करण्यात आलं आहे. कोरोना काळात हे केंद्र बंद करण्यात आलं होतं.

सूर्यदत्ता

सूर्यदत्ता ग्लोबल बिझनेस फोरमच्या वतीनं प्रसिद्ध बॅडमिंटनपटू पद्मभूषण सायना नेहवाल हिला क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल सूर्यदत्ता राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आलं. नवी दिल्ली इथं आयोजित सोहळ्यात फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. संजय चोरडिया यांच्या हस्ते सायनाला हा पुरस्कार देण्यात आला.

सीएसंस्था

राष्ट्रीय आणि जागतिक पातळीवर सनदी लेखापालांची मागणी मोठ्या प्रमाणात असल्यानं व्यावसायिक स्पर्धेची भीती बाळगू नये, असा सल्ला ज्येष्ठ सनदी लेखापाल, केंद्रीय समिती सदस्य चंद्रशेखर चितळे यांनी आज पुण्यात दिला. सीएच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित दोन दिवसांच्या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन सत्रात ते बोलत होते. या परिषदेला 1300 हून अधिक विद्यार्थी उपस्थित होते.

पर्यटन

श्रावण महिन्यात अवघी सृष्टी हिरवाईने नटली असताना पुणे जिल्ह्यातील गड-किल्ल्याना भेटी देणाऱ्या पर्यटकांच्या संख्येतही वाढ झाली आहे. गड किल्ल्यांवरील पर्यटनाला चालना देण्यासाठी ऑनलाईन तिकीट देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीनं विचार सुरु झाला आहे. हे ऐतिहासिक गड पुरातत्व खात्याच्या ताब्यात असले तरी राज्य पर्यटन महामंडळ आणि वन विभागाचा देखील या गडांच्या राखणीत मोठा सहभाग आहे. या तिन्ही विभागांच्या एकत्रित नियोजनातून गड किल्ल्यांवरील पर्यटनाला अधिक चालना देण्याच्या दृष्टिकोनातून नियोजन सुरु करण्यात आलं आहे.

मंडई

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रसह विविध राज्यातून नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. आवक स्थिर असली तरी मागणी वाढल्यानं भेंडी, मटार , वांगी, गवार आणि फ्लॉवर यांच्या भावात वाढ झाली. पालेभाज्यांमध्ये कांदापात, चुका, अंबाडी यांचे भाव घटले आहेत, तर मेथी आणि शेपू यांच्या भावात किंचित वाढ झाली. आवक रोडवल्यानं डाळिंब पपई लिंबू आणि खरबूज यांच्या भावात वाढ झाली. श्रावण महिना सुरू झाल्यानं फुल बाजारात उत्साही वातावरण असून, झेंडू आणि मोगरा यांच्या मागणीमुळे भाव टिकून आहेत.

निधन

पुण्यातील वन्यजीव अभ्यासक श्रीकर अष्टपुत्रे यांचं नुकतचं हृदयविकाराच्या तीव्र झटक्यानं पुण्यात निधन झालं. ते 44 वर्षांचे होते. अष्टपुत्रे यांनी साताऱ्यातील जोर-जांभळी संवर्धन राखीव क्षेत्राच्या निर्मितीसाठी पायाभूत काम केलं होतं.

हवामान

पुणे आणि परिसरात पावसाच्या तुरळक सरींचा शिडकावा झाला. उद्याही हलक्या पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार